# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ
आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
दूरध्वनी क्र. ०२०–२५६२२६६४, २५६२२६६६ ई–मेल directorsports@unipune.ac.in


संदर्भ: विक्रीमं/शिबीर/0032 दिनांक: १४ ऑगस्ट, २०२४.

**प्रति,**
**मा. प्राचार्य/मा. संचालक,**
**संबंधित संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था,**

**विषय: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न वरिष्ठ महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्थामधील शारीरिक शिक्षण संचालकांचे ३६ वे चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर २०२४–२५ बाबत.**

महोदय/महोदया,

वरील अनुसरून आपणांस या पत्राद्वारे कळविण्यात येते कि, शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मधील ३६ वे शारीरिक शिक्षण संचालकांचे चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या विद्यमाने व **ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळाचे मा. बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळे, ता. जुन्नर, जि. पुणे** या महाविद्यालयाच्या सौजन्याने **गुरूवार, दि. २९ ऑगस्ट, २०२४ ते शनिवार, दि. ३१ ऑगस्ट, २०२४** याकालावधीत **श्री क्षेत्र विघ्नहर देवस्थान ट्रस्ट, ओझर, ता. जुन्नर** येथे आयोजित करण्यात येणार आहे.

या चर्चासत्रास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न वरिष्ठ महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थामध्ये **पूर्ण वेळ कार्यरत असलेल्या शारीरिक शिक्षण संचालकांना उपस्थित राहणे क्रमप्राप्त व** अनिवार्य राहणार आहे.

या क्रीडा चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराबाबतची माहिती व खालील सूचना आपल्या महाविद्यालयातील पूर्ण वेळ कार्यरत असलेल्या शारीरिक शिक्षण संचालकांना निर्देशित करणे. ही विनंती.

**अ)** शारीरिक शिक्षण संचालक चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरास उपस्थित राहण्याबद्दल संबंधित शारीरिक शिक्षण संचालकांचा दैनंदिन भत्ता, प्रवास खर्च व इतर अनुषांगिक खर्च हा संबंधित महाविद्यालयाने करावा.

**ब)** चर्चासत्र व क्रीडा शिबीर मार्गदर्शनाचा कालावधी एकुण तीन दिवसांचा असेल. प्रत्येक शिबीरार्थीस नोंदणी शुल्क रू. ७५०/–(सातशे पन्नास रूपये फक्त) प्रतिदिनी याप्रमाणे रू. २,२५०/– (दोन हजार दोनशे पन्नास रूपये फक्त) व अनामत रक्कम म्हणून रू. १०००/– (एक हजार रूपये फक्त) एकूण रू. ३२५०/– (तीन हजार दोनशे पन्नास रूपये फक्त) रक्कम सहभागी होणाऱ्या शारीरिक शिक्षण संचालकांना **गुरूवार, दि. २९ ऑगस्ट, २०२४** रोजी नावनोंदणी करतेवेळी चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर आयोजन करणाऱ्या महाविद्यालयाकडे रोख स्वरूपात जमा करणे क्रमप्राप्त राहील. सदर दोनही रक्कमेची रीतसर पावती सहभागी शारीरिक शिक्षण संचालकांना देण्यात येईल.

**दि. ३१ ऑगस्ट, २०२४** रोजी रू. १०००/— (एक हजार रूपये फक्त) अनामत रक्कमेची पावती सादर केल्यानंतर रू. १०००/— (एक हजार रूपये फक्त) शारीरिक शिक्षण संचालकास परत करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

क) चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरास उपस्थित राहणाऱ्या शारीरिक शिक्षण संचालकांकरिता निवास, नाष्टा, चहापान, भोजन व आवश्यक स्टेशनरी ची सोय संयोजन महाविद्यालयामार्फत करण्यात येईल.

ड) **गुरूवार, दि. २९ ऑगस्ट, २०२४** रोजी चर्चासत्राच्या ठिकाणी ठीक **सकाळी ११.०० वाजेपर्यंत** सर्व शारीरिक शिक्षण संचालकांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. प्रत्येक सहभागी शिबीरार्थीजवळ नाव नोंदणी करताना संबंधित महाविद्यालय/संस्था यांचे **मा.प्राचार्य/मा.संचालकांचे संमतीपत्र** (शिबीरास उपस्थित राहण्याबाबतचे) **सादर करणे बंधनकारक राहिल अन्यथा संबंधित शारीरिक शिक्षण संचालकास सहभागी होता येणार नाही. यांची कृपया नोंद घ्यावी.** ही विनंती. **गुरूवार, दि. २९ ऑगस्ट, २०२४** रोजी दुपारी ठिक १.०० वा शिबीरार्थींना चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन व चर्चासत्र शिबीरातील कार्यक्रम इ.बाबत विशेष सूचना देण्यात येतील.

**टीप : सर्व शारीरिक शिक्षण संचालक (पुरूष/महिला) यांनी श्री क्षेत्र विघ्नहर देवस्थान ट्रस्ट, ओझर, ता. जुन्नर येथे वेळेवर उपस्थित राहावे.**

इ) **या चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराच्या कालावधीत कोणत्याही शारीरिक शिक्षण संचालकास खाजगी कामाकरीता अन्य ठिकाणी जाण्याची कोणत्याही प्रकारची सवलत दिली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. गुरूवार, दि. २९ ऑगस्ट, २०२४ ते शनिवार, दि. ३१ ऑगस्ट, २०२४** या कालावधीत होणाऱ्या शिबीराच्या प्रत्येक कार्यक्रमास उपस्थित राहणे अनिवार्य असेल तद्नंतरच संबंधित शिबीरार्थीस शिबीरास उपस्थितीबाबतचे **प्रमाणपत्र व कार्यमुक्ती आदेश (Reliving Order)** देण्यात येईल.

ई) चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर **उद्घाटन** व **समारोपदिनी** प्रत्येक शारीरिक शिक्षण संचालकांकडे पूर्ण पांढरा गणवेश (पोशाख) असणे आवश्यक आहे. नसल्यास किमान पांढरा शर्ट/टी—शर्ट आवश्यक राहील. महिला शारीरिक शिक्षण संचालकांना पांढरा पंजाबी ड्रेस आवश्यक राहील.

उ) या चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरामध्ये **नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP), खेळाडूंची पात्रता अर्ज (ऑनलाईन) भरणे प्रक्रियेबाबत, महाराष्ट्र शासन अंतर्गत क्रीडा अनुदान योजना, आहार विषयक जागृती, अॅरोबिक्स, स्पोर्टस् मॅनेजमेंट, क्रीडांगणावरील प्रथोमउपचार, योगासने व प्राणायाम प्रात्यक्षिके** इत्यादी विषयी व्याख्यानसह आयोजन करण्यात येणार आहे.

महत्त्वाच्या सूचना :

१. शिबीरार्थींनी शिबीरास येताना **मौल्यवान वस्तु अथवा रोख रक्कम** ही स्वत:च्या जवाबदारीवर आणावी. तसेच लागणारे आवश्यक औषधे सोबत आणावी.

२. निवासाची व्यवस्था क्रीडा संचालकांना प्रत्येक रूममध्ये तीन अथवा चार व्यक्ती अशाप्रमाणे उपलब्ध करून देण्यात येईल.

३. **गुरूवार, दि. २९ ऑगस्ट, २०२४** रोजी सकाळी ठीक ११.०० ते दुपारी १२.०० या कालावधीत **श्री क्षेत्र विघ्नहर देवस्थान ट्रस्ट, ओझर, ता. जुन्नर** येथे स्वागत व नोंदणीकक्ष येथे उपस्थित राहावे.

४. प्रत्येक सहभागी शारीरिक शिक्षण संचालकांने **आपल्या महाविद्यालयांचे ओळखपत्र** सोबत आणावे.

५. **आपल्या महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक सदर चर्चासत्र व क्रीडा मागदर्शन शिबीरास उपस्थित राहणार आहे किंवा नाही. याबाबत दि. २४ ऑगस्ट, २०२४ पर्यंत क्रीडा व शारीरिक शिक्षण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ईमेल (directorsports@unipune.ac.in) द्वारे त्वरित कळविण्यात यावे. ही विनंती.**

कृपया सदरचे पत्र आपल्या महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालकांच्या निदर्शनास आणुन या शिबीरातील, क्रीडा क्षेत्रातील आधुनिक बाबी अवलोकन करण्यासाठी आवश्य उपस्थित राहण्यास सांगावे. धन्यवाद! सहकार्याची अपेक्षा!

कळावे,

आपला,

**संचालक,**
**(अतिरिक्त कार्यभार)**
**क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ**

**प्रत माहितीसाठी:—**

**१) मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सहायक**
**२) मा. प्र—कुलगुरू यांचे कार्यकारी सहायक**
**३) मा. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**४) मा. सदस्य, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ**
**५) मा. वित्त व लेखाधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**६) मा. प्राचार्य, मा. बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळे, जुन्नर**
**७) मा. शा. शि. संचालक, मा.बाळासाहेब जाधव कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळे, जुन्नर**